क्रमांक : ४१२४/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ५ मार्च, २०२२

**संदर्भ** : या सचिवालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १९३८७ /क-१, दिनांक : २० डिसेंबर, २०२१

**:: कार्यालयीन आदेश ::**

संदर्भाधीन आदेशानुसार श्री.विजय देवजी देवरा यांची **अनुकंपा तत्त्वावर** या सचिवालयातील **"मदतनीस"** वेतनस्तर **एस :१ रु.१५०००-४७६००** पदावर दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजीपासून **पुढील आदेश होईपर्यंत** तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आली आहे. उक्त आदेशात श्री.देवरा यांनी आदेशाच्या दिनांकापासून **तीस दिवसांत** कार्यालयीन वेळेत हजर होण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

आदेशात नमूद केल्यानुसार नियुक्तीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२० डिसेंबर, २०२१ रोजीपासून ३० दिवसांचा कालावधी दि.१९ जानेवारी, २०२२ रोजीपर्यंत निश्चित आहे. तथापि, श्री.देवरा हे कार्यालयीन आदेशानुसार विहित मुदतीत कार्यालयात हजर झाले नाहीत.

श्री.देवरा हे मदतनीस या पदावर विहीत कालावधीत म्हणजेच दि.१९ जानेवारी, २०२२ रोजीपर्यंत रुजू न झाल्यामुळे श्री.देवरा यांची संदर्भाधीन आदेशान्वये मदतनीस या पदावर अनुकंपा तत्वावर करण्यात आलेली नियुक्ती **या आदेशान्वये रद्द करण्यात** येत आहे. भविष्यात श्री.देवरा यांना या सचिवालयात अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसंबंधी कोणतेही हक्क राहणार नाहीत.

आदेशानुसार,

**( मोहन काकड )**
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

**श्री.विजय देवजी देवरा,**
फ्लॅट क्र. २८१, बी-५,
वर्षा को-ऑप. हौ.सोसायटी,
मंगलमुर्ती हॉस्पीटल जवळ, गोराई-२
बोरीवली (प.), मुंबई- ४०० ०९१

प्रतिलिपी :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

६) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) वैयक्तिक नस्ती.

८) निवडनस्ती.